—: जाहिर निविदा :—

अहमदनगर मुख्यालयातील नवीन न्यायालयीन इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर नवीन प्रशस्त सभागृह तयार करण्यात आलेले आहे. सदर सभागृहामध्ये प्रवेश करताना चप्पट/बुट बाहेर काढून ठेवणे अपेक्षित आहे. जेणेकरुन कारपेट खराब होणार नाही. त्यासाठी अडीच फुट बाय सोळा फुटाचे दोन लाकडी चप्पल स्टॅण्ड, इंटरनेट कनेक्टीव्हीटीचे सर्व मॉडेमसाठी चार फुट बाय दोन फुटाचे एक कपाट बनविणे आवश्यक आहे. तसेच आतील प्रवेशद्वारापासून ते समोरील टेबलजवळील दोन कॉलमपर्यंत दोनही बाजूने अंदाजे दीड ते दोन फुट उंचीपर्यंत लाकडी आठ पीस उभे करुन त्यास साखळी बसवून जाणे येणेसाठी अधिक सोईचे होणार आहे. तसेच व्यासपीठावरील टेबलसाठी पाच लाकडी फुटरेस तयार करणे आवश्यक आहे. तसेच प्रबंधक, जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे कार्यालयाच्या दरवाजासाठी नवीन लॉक बसविणे गरजेचे असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्री करणा—यांकडून दरपत्रक मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.
२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.
३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.
४. आपल्या वस्तुचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.
५. सिलबद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.
६. सिलबद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.
७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.
८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.
९. सदरहु दरपत्रक दिनाक २२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यत देणे आवश्यक आहे.
१०. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.
११. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर याचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
१२. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.
१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक शुक्रवार दिनांक २२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— १२/०८/२०२५

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट